UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**VOLUME : I ISSUE II Oct to Dec 2017**



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION | SOCIAL SCIENCE | JOURNALISM

UGC Approved Sr.No.45681

Editor
**Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

# "बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण : स्वयंसहाय्यता गटाची भूमिका"

**प्रा. डॉ. एस.एन. आकुलवार**
लोकप्रशासन विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

आपल्या देशात महिलांकडे कायम अबला म्हणून पाहण्यात आले. तिचे क्षेत्र केवळ चूल आणि मूल इथपर्यंतच सिमीत ठेवण्यात आले. एवढेच नाही तर त्या कौटुंबिक अत्याचाराच्या कायम बळी रहात आल्या आहेत. महिलांना अजूनही मुख्य प्रवाहाचा घटक मानले जात नाही. कोणतेही राष्ट्र आर्थिक प्रगती साधत असताना महिलांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. महिलांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेतल्याशिवाय देशाचा विकास होवू शकत नाही. खेड्यातील बहुतांश महिला अद्याप निरक्षरतेच्या ओझ्यापासून मुक्त होवू शकलेल्या नाहीत, हे वास्तव आहे. ग्रामीण भागात भूमीहीन महिलांची संख्या लक्षणीय आहे. शेती, जनावरे सांभाळणे, मुलांची देखभाल, स्वयंपाक, लाकूड फाटा आणणे, साफसफाई या कामातच ग्रामीण महिला अडकलेल्या दिसतात. बेरोजगारी, कमी शिक्षण, अर्थार्जनासाठी आवश्यक अशा कौशल्याचा अभाव, पारंपारिक समजुतीमुळे घराबाहेर जावून काम करण्यावर मर्यादा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव या आणि अनेक विविध अडचणींचे डोंगर महिलांच्या मार्गात आहेत. त्यामुळेच ग्रामीण भागातील महिलांच्या सक्रिय सामाजिक सहभागावर मर्यादा आल्या असल्याचे सर्वसाधारण चित्र आहे. देशाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीकोनातून साक्षरतेचे महत्व निर्विवाद आहेच. तथापि आर्थिक बाबींचे नियंत्रण हातात येत नाही तो पर्यंत महिलांना व त्यांच्या कल्याणासाठी असणाऱ्या विविध उपक्रमांना बळ प्राप्त होणार नाही. वास्तविक गुणवत्ता व नियोजनामध्ये त्या पुरुषांपेक्षा तसूभरही कमी नसतात. परंतु ती समाज व्यवस्थेची बळी ठरलेली आहे. हे नाकारता येणार नाही म्हणून एक कमजोर घटक म्हणून महिलांच्या विकासावर आणि कल्याणावर विशेष लक्ष देण्यात गरज आहे. या करीता केवळ कायदे बनवूनच चालणार नाही. तर कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागणार आहे. ही अंमलबजावणी प्रभावीरित्या व्हावी या करिता जनजागृतीलाही तेवढेच महत्व आहे. रविंद्रनाथ टागोरांनी म्हटजेले आहेच, Woman is the builder and moulder of the Nation त्यात महिलांच्या सक्षमीकरणाला अनन्यसाधारण महत्व राहणार आहे, या बाबत शंका नाही. महिला सक्षमीकरण ही एक व्यापक अशी संकल्पना आहे. महिलांची आर्थिक उन्नती साधण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची अशी स्वयंसहाय्यता बचतगट चळवळ पुढे आली आहे. महिला सक्षमीकरणास चालना मिळाली आहे. स्वयंसहाय्यता बचतगट चळवळ आज ग्रामीण भागामध्ये उमेदीने वाटचाल करत आहे. या संकल्पनेचा मूळ उद्देश महिला सक्षमीकरण असल्यामुळे ही चळवळ जगभर मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे.

*** महिला सक्षमीकरण एक सैद्धांतिक परिप्रेक्ष्य :**

महिला स्वयंसहाय्यता गटाची सुरूवात आशिया खंडातील गरीब समजल्या जाणाऱ्या बांगला देशात झाली. अर्थतज्ञ प्रा. डॉ. महंमद युनूस हे बचतगट संकल्पनेचे प्रवर्तक मानले जातात. सन १९७० साली


16
077